**महाराष्ट्र शासन**

# भूमि अभिलेख विभाग

महसुल व वन विभागाकडील शासन मान्यता पत्र क्रमांकः ससेभ ०८२५/प्र.क्र. २७४/ आस्था-०६, दिनांक २१/०८/२०२५ नुसार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे व उपसंचालक भूमि अभिलेख अमरावती प्रदेश, अमरावती यांचे अधिपत्याखालील विविध कार्यालयातील खालील रिक्त पदे भरण्याकरीता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी विहीत अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांकडून स्पर्धात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१. भरावयाच्या पदांचा तपशील**

**विभाग – अमरावती**

**पदाचे नाव व वेतनश्रेणी- भूकरमापक,**

**वेतन स्तर- एस-६, (रु.१९९००-६३२००)**

| अ. क्र. | प्रवर्ग आरक्षण | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | समांतर आरक्षण विरहीत | एकुण पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | १ | ० | ० | २ | ० | १ | १ | ५ |
| | अनु. जमाती | २ | १ | ० | ४ | १ | १ | ३ | १२ |
| | वि.जा.अ. | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| | भ.ज.ब | १ | ० | ० | २ | ० | १ | १ | ५ |
| | भ.ज.क | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | भ.ज.ड | ० | ० | ० | १ | ० | ० | २ | ३ |
| | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | इ.मा.व. | २ | १ | ० | ४ | १ | १ | ३ | १२ |
| | एस.ई.बी.सी. | २ | १ | ० | ४ | १ | १ | ३ | १२ |
| | ईडब्ल्यूएस | १ | ० | ० | ३ | ० | १ | ४ | ९ |
| | अराखीव | ८ | ३ | १ | १७ | ३ | ६ | १७ | ५५ |
| | एकूण | १७ | ६ | १ | ३८ | ६ | १२ | ३७ | ११७ |
| | दिव्यांगाकरीता राखीव - एकुण- ०५, (अल्पदृष्टी-१, श्रवणदोष-२, अस्थीव्यंग-०, स्वमग्नता / मंदबुद्धी व वरील एकापेक्षा अधिक जास्त प्रकारचे दिव्यांग - ०२.) | | | | | | | | |
| | अनाथांकरीता राखीव- एकूण- ०१ (संस्थात्मक- ०१, संस्थाबाह्य -०.) | | | | | | | | |

**२. विहित शैक्षणिक अर्हताः**

उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास (दिनांक २४/१०/२०२५) रोजी धारण केलेली असावी.

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | अर्हता / अनुभव |
|---|---|---|
| १ | भूकरमापक | १) मान्यता प्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील किंवा मान्यता प्राप्त संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) किंवा माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केल्यावर मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे दोन वर्षांचे सर्वेक्षक व्यवसायाचे प्रमाणपत्र. **<br>२) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. गतीचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र.<br>उपरोक्त क्र. (२) मध्ये नमुद टंकलेखन विषयक अर्हता पूर्ण करत नसलेली व्यक्ती सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र ठरेल. परंतु, अशा व्यक्तीने सदर अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सदर अर्हता धारण न केल्यास तो / ती सेवा समाप्तीस पात्र राहील. |

**** केंद्र शासनाच्या मा. महासंचालक, रोजगार व प्रशिक्षण क्र. DGE&T-१९/०६(१)/ २०१४-CD, दिनांक ०४ जुलै २०१४ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकवला जाणाऱ्या सर्व्हेअर अभ्यासक्रमाचा कालावधी प्रवेश सत्र ऑगस्ट २०१४ पासून एक वर्ष कालावधीचा झालेला आहे. त्यानुसार अभ्यासक्रम पुर्ण करुन त्याबाबतचे वैध प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार वरील पदाकरीता अर्ज करण्यास तसेच परिक्षेस बसण्यास पात्र असतील, मात्र त्याबाबत शासनाकडून प्राप्त होणाऱ्या पुढील आदेशानुसार त्यांचे निवडीबाबत कार्यवाही करण्यात येईल व त्याबाबत शासनाकडील निर्णय अंतिम राहील.**

३. वेळापत्रक -

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन भरण्याचा कालावधी | दिनांक ०१/१०/२०२५ सकाळी ११.०० ते दिनांक २४/१०/२०२५ रात्री २३.५९ पर्यंत |
| २ | ऑनलाईन शुल्क भरण्याचा कालवधी | दिनांक ०१/१०/२०२५ सकाळी ११.०० ते दिनांक २४/१०/२०२५ रात्री २३.५९ पर्यंत |
| ३ | परीक्षेचा प्रस्तावित दिनांक | १३ व १४ नोव्हेंबर, २०२५*** |

*** नियोजनच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल होवू शकतो.

प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भात संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबत सविस्तर तपशीलासाठी विभागाच्या https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे अवलोकन करावे.

ऑनलाईन अर्ज वरील संकेतस्थळावर दिनांक ०१/१०/२०२५ ते २४/१०/२०२५ पर्यंत स्विकारण्यात येतील.

विभागाच्या https://ibpsreg.ibps.in/gomsep25/ व https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**(महेशकुमार शिंदे)**
**सदस्य सचिव, गट क निवड समिती तथा**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**संलग्न उपसंचालक भूमि अभिलेख**
**अमरावती प्रदेश, अमरावती.**

DGIPR-2025-26/2848

Mahabharti.in